जनसंपर्क कक्ष
11 AUG 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील क्रांतीवन सुशोभिकरणाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतीवन परिसराच्या सुशोभीकरणाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. क्रांतीदिनानिमित्त शहीद क्रांतीकारकांना क्रांतीवनातील स्मृतीस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिवादन केले. त्यानंतर सदर नूतनीकृत क्रांतीवनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. लवकरच हे क्रांतीवन ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे.


कोल्हापूर : क्रांती दिनानिमित्त अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. गिरीश कुलकर्णी आदी.

नूतनीकृत क्रांतीवनामध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविलेला सुमारे ५०० मीटरचा प्रशस्त वॉकिंग ट्रॅक बनविण्यात आला आहे. उद्यानात पारसदृश बैठक व्यवस्था करण्यात आली असून योगासनांसाठी मंच उभारला आहे. सुशोभीकरणासाठी सौरदिवे, आसनव्यवस्था यासाठी बँक, उद्योगांकडून भरीव देणगी प्राप्त झाली आहे. शहीदांच्या नामफलकांचे आणि 'अनाम वीरा...' कवितेच्या फलकाचेही, नूतनीकरण करण्यात

- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्मृतीस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन**

आले आहे. संरक्षक भिंतीची दुरुस्ती व रंगकामही करण्यात आले आहे. उद्यानामध्ये वृक्षारोपन करण्यात आले आहे. या परिसरात प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिकांना प्रवेश देण्यात येणार आहे. कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा..' या कवितेचे सामूहिक वाचन करण्यात आले आणि राष्ट्रीय एकात्मतेची शपथही घेण्यात आली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. भारती पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. कैलास सोनवणे,आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
11 AUG 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतिवन परिसराच्या सुशोभीकरणाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात क्रांतिदिनानिमित्त शहीद क्रांतिकारकांना क्रांतिवनातील स्मृतिस्थळावर पुष्पचक्र अर्पण करून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिवादन केले. त्यानंतर क्रांतिवनाचे उद्घाटन करण्यात आले. लवकरच हे क्रांतिवन ज्येष्ठ नागरिकांसाठी खुले करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रमांक आठ प्रवेशद्वारासमोरील भागात क्रांतिवन आहे. या ठिकाणी कोल्हापूर, सांगली व सातारा आणि सोलापूर (सन २००३ पर्यंत) जिल्ह्यांतील शहिदांचे स्मृतिफलक आहेत. या क्रांतिवन परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामास २० मे, २०२३ रोजी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी सुशोभीकरणाचे काम क्रांतिदिनापर्यंत पूर्ण करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार या नूतनीकृत क्रांतिवनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. भारती पाटील, डॉ. राजाराम गुरव, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. केशव राजपुरे, डॉ. विजय फुलारी, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली आदी उपस्थित होते.

लोकमत

# जी-२० संकल्पनेवरील रील्सचे उद्या सादरीकरण

## शिवाजी विद्यापीठात आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशन विभागामध्ये जी-२० संकल्पनेवर आधारित रील्सचे उद्या शनिवारी सादरीकरण होणार आहे. पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठातील जी-२० उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर आहेत. जी- २० देशाच्या परिषदेचे अध्यक्षपद यावेळी आपल्या देशाकडे आहे. या पार्श्वभूमीवर देशातील विविध विद्यापीठांमध्ये विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठानेही अनेक उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्यामध्ये रील मेकिंग हा उपक्रम एम.ए. मास कम्युनिकेशन विभागाकडे दिला आहे.

आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता, अशा विविध अंगांनी जगातील महत्त्वाच्या वीस देशांच्या प्रमुखांमध्ये गंभीरपणे चर्चा सुरू आहे. या मुद्यांना धरून विद्यार्थ्यांनी रील्स तयार केल्या आहेत. त्यांचे सादरीकरण होणार आहे. रील्स तयार करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

लोकमत

# कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात शनिवारी आयोजित कॅमेरा हँडलिंग वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांच्या हस्ते वर्कशॉपचे उद्घाटन झाले.

यावेळी समाजशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. आर. बी. पाटील, चित्रपट अभ्यासक डॉ. अनमोल कोठाडिया, आनंदा पांढरबळे, जयप्रकाश पाटील, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, गिरीश फोंडे उपस्थित होते.

डेहराडून येथील अकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटचे विराज चव्हाण यांनी प्रॉडक्ट फोटोग्राफी, आर्किटेक्चर फोटोग्राफी यासह भारतीय लष्करासाठी केलेली फोटोग्राफी, हेरिटेज इमारतीची फोटोग्राफीचे सादरीकरण केले. पहिल्या सत्रात कॅमेरा बॉडी, पिक्सल, कॅमेरा वर्क, शटर स्पीड, लाईट इफेक्ट, व्हाईट बॅलन्स, फोटो स्पीड यांच्यासह अनेक तांत्रिक बाबींची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. दुसऱ्या सत्रात प्रत्यक्ष कॅमेरा हाताळणी, फोटो अँगल याचे डेमो करून दाखवले.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. गौतमी शिकलगार हिने स्वागत केले. मेघा मोहिते हिने आभार मानले.

पुढारी

# आ. पडळकर यांची विद्यापीठ सिनेटवर नियुक्ती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांची नियुक्ती झाली आहे. या निवडीचे पत्र विधानमंडळ सचिवालयाच्या अव्वर सचिव पुष्पा दळवी यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना दिले आहे.

आ. पडळकर हे विधान परिषद सदस्य आहेत. विद्यापीठाच्या सिनेटरवर विधान परिषदेतून एका लोकप्रतिनिधीची निवड केली जाते. यामध्ये पडळकर यांना संधी मिळाली आहे. विधान परिषद उपसभापतींनी पडळकर यांची नेमणूक केली आहे. ३ ऑगस्ट २०२३ पासून १३ मे २०२६ पर्यंत पडळकर सिनेट सदस्य म्हणून कायम राहतील. पडळकर यांना भाजपच्या कोट्यातून विधान परिषदेवर संधी मिळाली आहे.

पुढारी

# डॉ. एस. आर. रंगनाथन यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागामार्फत भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे औचित्य साधून शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये सेट व नेट परीक्षेत यश संपादन केलेल्या अधिविभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रंथालय माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, प्रा. डॉ. युवराज जाधव, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, सर्व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

11 AUG 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जी-२० संकल्पनेवरील रिल्सचे उद्या विद्यापीठात सादरीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागामध्ये जी-२० संकल्पनेवर आधारित रिल्सचे सादरीकरण शनिवारी (दि. १२) होणार आहे.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी ३ वाजता हा कार्यक्रम होईल. अध्यक्षस्थानी विद्यापीठातील जी-२० उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर असणार आहेत.

जगासमोर भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जी-२० देशांनी काही संकल्पना राबवण्याचे निश्चित केले आहे. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता अशा विविध अंगाने जगातील महत्त्वाच्या २० देशांमध्ये गंभीरपणे चर्चा सुरू आहे. या मुद्द्यांना धरून विद्यार्थ्यांनी रिल्स तयार केल्या आहेत. या रिल्सचे सादरीकरण होणार आहे. रिल्स तयार करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ६२० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी ४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. या परीक्षांसाठी १ हजार ६५९ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात २ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले असून, आजअखेर ६२० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकांकडून दि. १० ऑगस्ट, २०२३ रोजी कोल्हापूर जिल्ह्यामधून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली आहे.

तरुण भारत


# शिवाजी विद्यापीठातील २२१ जणांनी केले रक्तदान

**कोल्हापूर :** सीपीआर हॉस्पिटलच्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवाजी विद्यापीठ आणि ऊर्जा मैत्र परिवाराने क्रांतिदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले. शिबिरात २२१ जणांनी रक्तदान केले. राजमाता जिजाऊ सभागृहात शिबीर झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शिबिरास भेट दिली. यावेळी प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एम. एस. देशमुख, एनएसएस विभागाचे डॉ. चौगले, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगले, सुनील दळवी, दिग्विजय देसाई, विशाल पाटील, रणजीत कांबळे, प्रदीप बोभाटे, राजेश पाटील, राम चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

तरुण भारत

11 AUG 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# विद्यापीठात शनिवारी जी-२० रिल्सचे सादरीकरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागामध्ये जी-२० संकल्पनेवर आधारित रिल्सचे सादरीकरण शनिवार १२ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठातील जी-२० उपक्रमाचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर आहेत. जी- २० चे अध्यक्षपद यावेळी भारताकडे आहे.

देशासाठी ही मोठी सन्मानाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर देशातील विविध विद्यापीठांमध्ये विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यामध्ये रील मेकिंग हा उपक्रम एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाकडे देण्यात आला आहे. जगासमोर भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जी-२० देशांनी काही संकल्पना राबवण्याचे निश्चित केले आहे.

आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता अशा विविध अंगाने जगातील महत्त्वाच्या वीस देशांमध्ये गंभीरपणे चर्चा सुरू आहे. या मुद्यांना धरून विद्यार्थ्यांनी रिल्स तयार केल्या आहेत. या रिल्सचे सादरीकरण होणार आहे. रिल्स तयार करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे, अशी माहिती मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

तरुण भारत

# विद्यापीठातील ६२० अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी परीक्षांपैकी ६२० परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षा झाल्यानंतर २० दिवसाच्या आत निकाल जाहीर केले आहेत. तसेच गुरुवारी झालेल्या परीक्षेला १६५९ विद्यार्थी उपस्थित होते. बॅचलर ऑफ लॉ (पाच वर्षे) बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ लॉ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी या विषयाचा समावेश आहे.